# सायबर सुरक्षेसाठी शिक्षक, विद्यार्थी सन्मानित

मुंबई : जागतिक सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील क्विक हीलने आपल्या सीएसआर उपक्रमाच्या माध्यमातून अंधेरीतील वालिया कॉलेज येथे 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा पुरस्काराचे आयोजन केले होते. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषतः समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि चार शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले.